नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५५ Issue - 255 | वार बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६ Blow- Wednesday Date 4 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारत-चीन वादावरुन लोकसभेत गोंधळ

## अध्यक्षांच्या दिशेने कागद भिरकावले; काँग्रेसचे सात, माकपचा एक खासदार निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही लोकसभेत मोठा गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. भारत-चीन वादाचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांकडून गोंधळ घालण्यास सुरूवात झाली.

त्यानंतर काँग्रेसच्या काही खासदारांनी पीठासन सभापतींच्या दिशेने कागद भिरकावले. त्यामुळे पीठासन सभापतींनी काँग्रेसच्या सात आणि माकपच्या एका खासदाराला





अधिवेशनाच्या कार्यकाळापर्यंत निलंबित केलं.

कुणाला निलंबित करण्यात आलं?

१. गुरदीप सिंह औजला २. मणिकम टागोर ३. अमरिंदर सिंह राजा वारिंग ४. किरण कुमार रेड्डी ५. हिबी ईडन ६. डीन कुरियाकोस ७. प्रशांत पडोले ८. एस वेंकटेशन - माकपा

भारत चीन वादावरुन संसदेत गोंधळ

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपतींच्या धन्यवाद प्रस्तावावर बोलताना पूर्व लष्कर प्रमुख एमएम नरवणे यांच्या न प्रकाशित झालेल्या पुस्तकाचा दाखला दिला. त्यावरुन मोठा गोंधळ निर्माण झाला. भारत आणि चीनच्या लष्करादरम्यान गलवान खाडीमध्ये झालेल्या वादावर त्या पुस्तकात नरवणे यांनी त्यांचं मत मांडलं आहे. परंतु, सत्ताधाऱ्यांनी राहुल गांधी यांच्या या मुद्द्याला विरोध केला. त्यानंतर झालेल्या गोंधळामुळे संसदेचं कामकाज तहकुब करण्यात आलं.

दुसऱ्या दिवशीही हा वाद सुरूच राहिल्याचं दिसून आलं. लोकसभेची कार्यवाही सुरू झाल्यानंतर हा मुद्दा पुन्हा उपस्थित करण्यात आला. त्यानंतर सत्ताधारी आणि विरोधक खासदारांनी गोंधळास सुरूवात केली. या दरम्यान, काँग्रेसच्या काही खासादारांनी पीठासन सभापतींच्या दिशेने कागद भिरकावले. त्यामुळे एकूण आठ खासदारांना निलंबित करण्याचा निर्णय पीठासन सभापतींनी घेतला.

आठ खासदारांना निलंबित करण्याच्या निर्णयाच्या विरोधात काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी विरोध केला. त्यांनी या निर्णयाविरोधात संसदेच्या परिसरात आंदोलन सुरू केल्याचं दिसून आलं.

# खरेदी प्रस्तावांना मान्यता देण्यास बंदी; देवेंद्र फडणवीसांचा मोठा निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सरकारी विभागांमधून होणाऱ्या मनमानी व अनावश्यक खरेदीवर आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पावलं उचलली आहे.

अर्थ विभागाची सूत्रे स्वतःकडे घेताच नवीन निविदा काढण्यावर आणि खरेदी प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यावर बंदी घालण्याचे आदेश देवेंद्र फडणवीसांनी दिली आहेत.

२५ फेब्रुवारीपासून कोणत्याही खरेदी प्रस्तावांना मान्यता देण्यात येणार नाही. तसेच नव्या निविदा काढल्या जाणार नाहीत, असे निर्देश वित्त विभागाकडून सर्व विभागांना दिले आहेत. फर्निचर दुरुस्ती, ड्रायव्हर मशीन, संगणक, उपकरणे, सुटे भाग, भाड्याने कार्यालय घेणे, सेमिनार, भौतिक कार्यशाळा आदी बाबींवरील खर्चाचा समावेश आहे. मात्र, औषधे खरेदीला या निर्बंधातून वगळण्यात आले आहे. आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाला औषध खरेदीसाठी परवानगी देण्यात आली असून, केंद्र पुरस्कृत योजना, त्याअंतर्गत राज्य हिस्सा तसेच बाह्य सहाय्यित प्रकल्पांतील खरेदी प्रस्तावांनाही सूट देण्यात आली आहे.

अर्थखात्याचा आढावा घेत खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे स्पष्ट संकेत

आर्थिक वर्ष संपत असताना अनेक विभागांकडून केवळ निधी खर्च करण्यासाठी घाईघाईने खरेदी केली जात असल्याचा अर्थ विभागाचा आरोप आहे. हा आदेश सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था तसेच नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थखात्याचा आढावा घेत खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. 'लाडकी बहीण' योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर वाढलेल्या ताणाच्या पार्श्वभूमीवर निर्णयाची शक्यता आहे.

राज्याचं अर्थखातं दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे होतं. तसेच क्रीडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास खातंही अजित पवारांकडे होतं. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर क्रीडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ ही तीन खाती दिली. मात्र, अजित पवार यांच्याकडे असणारं अर्थ आणि नियोजन खातं सध्या सुनेत्रा पवार यांना देण्यात आलेलं नाही. अर्थ खातं देवेंद्र फडणवीसांनी ठेवलं. येत्या ६ मार्चला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करतील. पुढील काळात अर्थखातं राष्ट्रवादी काँग्रेसकडे राहील अशी माहिती आहे.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थी कलशाचे पूजन करून चंद्रभागा नदीमध्ये सोडण्यात आल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अस्थी कलश पूजन करून चंद्रभागेच्या नदीमध्ये असती सोडण्यात आल्या.

यावेळी आमदार अभिजीत पाटील, शिवसेनेचे संजय बाबा कोकाटे, वसंत नाना देशमुख, श्रीकांत शिंदे, संदीप मांडवे, सुरज पेंटल, संदीप पाटील तालुकाध्यक्ष, अतुल चव्हाण सुमित शिंदे प्रशांत शिंदे वर्षा शिंदे चारुशाला कुलकर्णी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# पियुष गोयल यांच्या वक्तव्यानंतर राष्ट्रवादीमध्ये नाराजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पियुष गोयल यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरुन केलेल्या वक्तव्यावरुन राष्ट्रवादीमध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. ती नाराजी राष्ट्रवादीने भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या कानावर घातल्याची माहिती आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीची सूत्रं कुणाच्या हाती जाणार याबाबत तर्कवितर्क लढवले जात होते. त्यातच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चादेखील सुरू होती. अशातच केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी त्यावर भाष्य केलं होतं. एका खासगी वृत्तवाहिनीला मुलाखत देताना पियुष गोयल यांनी प्रफुल पटेलांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याचं सांगितलं होतं. एकीकडे सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षाची सूत्रे हाती द्या अशी मागणी होत होती. त्याचवेळी पियुष गोयल यांनी हे वक्तव्य केल्यानंतर त्यांच्यावर जोरदार टीका सुरू झाली. स्वतः प्रफुल पटेल यांनी यावर नाराजी व्यक्त करत तसा कोणताही निर्णय झाला नसल्याची माहिती दिली होती. या मुद्द्यावरून भाजपचा राष्ट्रवादीच्या निर्णयप्रक्रियेमध्ये हस्तक्षेप होतोय का अशी शंकाही उपस्थित केली जात होती. दरम्यान, पियुष गोयल यांनी या आधीच त्यांच्या वक्तव्यावरुन माफी मागितली आहे. दिल्लीतील एका वरिष्ठ पत्रकाराने आपल्याला चुकीची माहिती दिल्याने आपल्याकडून हे वक्तव्य झालं असं ते म्हणाले.



प्रफुल पटेलांनी घेतली मोदी-शाहांची भेट

दरम्यान, प्रफुल पटेल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची स्वतंत्रपणे भेट घेतल्याची माहिती समोर आली. या दोन्ही नेत्यांशी प्रफुल पटेल यांनी सहा ते सात मिनिटे चर्चा केली. या चर्चेचा तपशील अद्याप समोर आला नाही. ज्यांचा आमच्या पक्षाशी संबंध नाही, ते आमच्या पक्षाबद्दल बोलतात, अशी टीका राष्ट्रवादीबाबत बोलणाऱ्यांवर प्रफुल पटेल यांनी केली आहे. विधिमंडळाचा नेता कुणाला निवडावा हा आमच्या पक्षाचा प्रश्न असल्याचंही पटेल म्हणाले. तसेच सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री केल्याने काही लोकांच्या पोटात दुखत असल्याचा टोलाही त्यांनी लगावला. अजितदादानंतर राष्ट्रवादीची सूत्रं कुणाकडे जाणार याबाबत प्रक्रिया पार पडत असल्याचं प्रफुल पटेल यांनी स्पष्ट केलं. राष्ट्रीय अध्यक्षपदाचा निर्णय योग्य वेळी होणार असल्याचंही त्यांनी म्हटलंय. तसेच आमच्यासमोर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा प्रश्न नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

### राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाबद्दल प्रफुल्ल पटेलांची मोठी घोषणा

### घोषणेने सर्व चर्चा संपवल्या

# राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष पदाच्या स्पर्धेत नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार, यावरून मागील काही दिवसांपासून राजकीय रणकंदन सुरू आहे. प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची या पदासाठी चर्चा सुरू झाल्यानंतर तर्क-वितर्क लढवले जात होते. मात्र आता पटेल यांनी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. राष्ट्रवादी पक्षाच्या अध्यक्षपदाचा निर्णय योग्य रीतनेच होईल, योग्य दिशेनेच होईल, योग्य व्यक्तीचाच होईल आणि माझ्याशिवाय होईल, असं म्हणत आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या स्पर्धेत नसल्याचं प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर केलं आहे.

जे लोक कधीही लोकांमध्ये जाऊन निवडणूक लढले नाहीत, अशा लोकांनी माझ्याबद्दल चर्चा करणं योग्य आहे का? १९५२ पासून माझ्या वडिलांना जनतेनं निवडून दिलं आणि मलाही अनेक वर्षे लोकांनी निवडून दिलं आहे. आमच्याबद्दल आणि आमच्या बॅकग्राऊंडबद्दल कोणी अशी चर्चा करत असेल तर त्यांना लाज वाटली पाहिजे, असा हल्लाबोल प्रफुल्ल पटेल यांनी टीकाकारांवर केला आहे. तसंच आमच्याकडून राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाबद्दल कोणतंही वक्तव्य केलं गेलेलं नसताना उगाच हे वादळ निर्माण करणं आणि आमच्या पक्षात संशय निर्माण करणं, ही अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे. आमच्या पक्षाच्या अध्यक्षपदाचा आम्ही योग्य निर्णय घेणार आहोत. मी सोडून इतर कोणाकडे तरी अध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाईल. योग्य व्यक्तीची या पदावर निवड केली जाईल. मी राष्ट्रवादीचा कार्याध्यक्ष म्हणून अजितदादांच्या निधनानंतर पुढे काय,



नेतृत्व कोणाकडे, या सगळ्या गोष्टी बघण्याची जबाबदारी माझ्यावर आहे आणि मी ती योग्य रीतीने पार पाडत आहे, असा दावा पटेल यांनी केला आहे.

राज ठाकरेंवर पलटवार

राष्ट्रवादीसारख्या रांगड्या पक्षाचा अध्यक्ष कोणीतरी मराठी झाला पाहिजे, कोणी पाटील चालेल, पण पटेल नको, असं म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधला होता. त्यावर उत्तर देताना पटेल म्हणाले की, राज ठाकरे किंवा इतर कोणी आमच्या पक्षाचा विधीमंडळ नेता किंवा अध्यक्ष कोण होणार, हे ठरवणार का? ते आमच्या पक्षाचे नेते आहेत का? राज ठाकरे असतील किंवा सकाळचे जे ९ वाजताचे बुलेटिन आहे , ते आम्हाला आम्ही काय करायचं सांगत आहेत. पण आम्ही उपमुख्यमंत्रिपदाबाबत जसा योग्य निर्णय घेतलाय, तसाच योग्य निर्णय राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाबद्दल घेऊ आणि त्याची प्रक्रिया सुरू आहे, असं ते म्हणाले.

दरम्यान, प्रफुल्ल पटेल यांनी आज राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाच्या स्पर्धेत आपण नसल्याचं जाहीर केल्याने सुनेत्रा पवार यांची निवड या पदावर निश्चित मानली जात आहे.

# केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट, राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा' (सी-टीईटी) देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या कर्तव्यातून सूट देण्यात आली असून, तसे निर्देश सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

राज्य निवडणूक आयोगानं जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदानाची तारीख निश्चित करुन शिक्षकांना निवडणुकीच्या कामासाठी ड्युटी लावली होती. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळं तारखांमध्ये बदल करण्यात आला. यामुळं केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणाऱ्या शिक्षकांसमोर अडचण निर्माण झाली होती.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आल्यानंतर १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्याच वेळी राज्यातील काही शिक्षकांची सी-टीईटी परीक्षा असल्यामुळे संबंधित शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट देऊन, पर्यायी व्यवस्था करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाला सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार १५ फेब्रुवारीपर्यंत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम पार पाडायचा आहे. राज्य निवडणूक आयोगानं १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी मतदानाची तारीख ५ फेब्रुवारी आणि निकालाची तारीख ७ फेब्रुवारी निश्चित केली होती. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार जिल्हा परिषदेच्या प्रचारासाठी मुंबईहून बारामतीला जात असताना २८ फेब्रुवारीला जात होते. बारामती विमानतळाजवळ त्यांचं विमान दुर्घटनाग्रस्त झालं. यात अजित पवार यांचं अपघाती निधन झालं.

यामुळं महाराष्ट्रात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला होता. यामुळं जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या मतदान आणि मतमोजणीच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला होता.

दैनिक
**यश सिद्धि न्यूज**

बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६



## संपादकीय....

### अर्थखात्याचा पदभार

राज्यातील सरकारी विभागांमधून होणाऱ्या मनमानी व अनावश्यक खरेदीवर आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पावलं उचलली आहे. अर्थ विभागाची सूत्रे स्वतःकडे घेताच नवीन निविदा काढण्यावर आणि खरेदी प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यावर बंदी घालण्याचे आदेश देवेंद्र फडणवीसांनी दिली आहेत. २५ फेब्रुवारीपासून कोणत्याही खरेदी प्रस्तावांना मान्यता देण्यात येणार नाही. तसेच नव्या निविदा काढल्या जाणार नाहीत, असे निर्देश वित्त विभागाकडून सर्व विभागांना दिले आहेत. फर्निचर दुरुस्ती, ड्रायव्हर मशीन, संगणक, उपकरणे, सुटे भाग, भाड्याने कार्यालय घेणे, सेमिनार, भौतिक कार्यशाळा आदी बाबींवरील खर्चाचा समावेश आहे. मात्र, औषधे खरेदीला या निर्बंधातून वगळण्यात आले आहे. आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाला औषध खरेदीसाठी परवानगी देण्यात आली असून, केंद्र पुरस्कृत योजना, त्याअंतर्गत राज्य हिस्सा तसेच बाह्य सहाय्यित प्रकल्पांतील खरेदी प्रस्तावांनाही सूट देण्यात आली आहे. आर्थिक वर्ष संपत असताना अनेक विभागांकडून केवळ निधी खर्च करण्यासाठी घाईघाईने खरेदी केली जात असल्याचा अर्थ विभागाचा आरोप आहे. हा आदेश सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था तसेच नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थखात्याचा आढावा घेत खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. 'लाडकी बहीण' योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर वाढलेल्या ताणाच्या पार्श्वभूमीवर निर्णयाची शक्यता आहे. राज्याचं अर्थखातं दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे होतं. तसेच क्रीडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास खातंही अजित पवारांकडे होतं. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर क्रीडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ ही तीन खाती दिली. मात्र, अजित पवार यांच्याकडे असणारं अर्थ आणि नियोजन खातं सध्या सुनेत्रा पवार यांना देण्यात आलेलं नाही. अर्थ खातं देवेंद्र फडणवीसांनी ठेवलं.

# मराठवाड्यातील 'दुष्काळ' पुसून टाकणार, वॉटर ग्रीड पुन्हा सुरू, कन्नडचा बॅकलॉग भरून काढण्याचा शिंदेंचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प आधीच्या सरकारने बासनात गुंडाळून ठेवला होता, मात्र आमच्या सरकारने तो पुन्हा सुरू केला असून मराठवाड्यातील ''दुष्काळ'' हा शब्द कायमचा पुसून टाकण्याचा आमचा निर्धार आहे. यासाठी निधीची कमतरता कधीही भासू दिली जाणार नाही, असे ठाम प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. कन्नड तालुक्याला आतापर्यंत अपेक्षेप्रमाणे विकास निधी मिळाला नसल्याचे मान्य करत, येत्या काळात कन्नडचा विकास बॅकलॉग भरून काढण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील देवगाव रंगारी येथे आयोजित जाहीर प्रचार सभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. या सभेला प्रचंड गर्दीचा महापूर लोटला होता.

यावेळी छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, खासदार संदीपान भुमरे, आमदार संजना जाधव, आमदार प्रा.रमेश भोरनारे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, उमेदवार आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. सभेला उशीर झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत शिंदे म्हणाले की, राज्यात घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे दु:खाचे सावट आहे. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांनी या कठीण काळातही निवडणुका टाळता येत नसल्याने प्रचार सभा घ्याव्या लागत असल्याचे सांगितले. ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे ते म्हणाले. कन्नड, वैजापूर आणि गंगापूर या तीन तालुक्यांतील सर्व पदाधिकारी, उमेदवार आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. शिंदे यांनी आपल्या भाषणात महिलांच्या सहभागावर विशेष भर दिला. ''ज्या उमेदवारांच्या पाठीशी लाडक्या बहिणी उभ्या असतात, त्यांचा विजय निश्चित असतो,'' असा अनुभव विधानसभेपासून नगरपरिषद आणि महापालिका निवडणुकांपर्यंत घेतल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या जीवनप्रवासाचा उल्लेख करत ते म्हणाले की, आपणही शेतकऱ्याचा मुलगा असून गरिबी, आईची तगमग आणि पत्नीची काटकसर जवळून पाहिली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री झाल्यानंतर सर्वप्रथम ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना'' सुरू करण्याचा निर्णय घेतला. या योजनेवर विरोध झाला, न्यायालयात आव्हाने दिली



गेली, मात्र आज या योजनेमुळे लाखो महिलांना आधार मिळाल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

या योजनेवर वर्षाला सुमारे ४५ हजार कोटी रुपयांचा खर्च होत असल्याचा उल्लेख करत, हा खर्च अर्थव्यवस्थेला चालना देणारा असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक महिलांनी या रकमेतून लहान व्यवसाय सुरू केले, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय उपचार आणि घरखर्चाला हातभार लावला असल्याच्या यशकथा त्यांनी उदाहरणांसह मांडल्या.

शिंदे यांनी शिक्षण धोरणाविषयी बोलताना एका विद्यार्थिनीच्या आत्म हत्येच्या घटनेचा उल्लेख केला. त्या घटनेनंतर उच्च शिक्षणासाठी ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के फी माफ करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. ''राज्य हे सर्वसामान्यांचे आहे. शिक्षणासाठी कोणालाही आत्म हत्या करावी लागू नये, ही आमची भूमिका आहे,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले.

शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख करताना त्यांनी पीक विमा योजना, नुकसान भरपाई, सततच्या पावसामुळे झालेल्या हानीसाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज आणि शेतकरी कर्जमाफीचा निर्णय महायुती सरकारने घेतल्याचे सांगितले.

मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांवर भर देत ते म्हणाले की, मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्याच कॅबिनेटमध्ये सिंचन प्रकल्पांना मंजुरी दिली. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प पुन्हा सुरू करून दुष्काळ कायमचा संपवण्याचा संकल्प सरकारचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, आपल्या कार्यकाळात ७० ते ८० हजार रुग्णांना सुमारे ४५० कोटी रुपयांची मदत देण्यात आली. ''हे पैसे जनतेचे आहेत, लोकांचे प्राण वाचवण्यासाठी आहेत, साठवण्यासाठी नाहीत,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले.

कन्नड तालुक्याच्या विकासाबाबत बोलताना शिंदे म्हणाले की, आतापर्यंत कमी निधी मिळाल्याचा बॅकलॉग आता भरून काढला जाईल. रस्ते, पाणी, उद्योग, पर्यटन आणि जलसंधारण विभागाच्या माध्यमातून विकासाला गती दिली जाईल, असे आश्वासन दिले.

महिला, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक हे सरकारचे केंद्रबिंदू असल्याचे सांगत, ''जे बोलतो ते करून दाखवतो, हा आमचा स्वभाव आहे,'' असे त्यांनी नमूद केले. शिंदे यांनी विरोधकांवर नाव न घेता टीका करताना म्हटले की, काही लोक फक्त आरोप करतात, घोषणा करतात आणि निवडणुकीपुरते आश्वासन देतात. मात्र आम्ही जे बोलतो ते करून दाखवतो, हा आमचा स्वभाव आहे. कामातून उत्तर देण्याची आमची परंपरा असून सत्ता येते आणि जाते, पण दिलेला शब्द पाळणारे नेते जनतेच्या मनात कायम राहतात, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावला. भाषणाच्या शेवटी येत्या ७ तारखेला होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत धनुष्यबाण चिन्हासमोरील बटण दाबून सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन शिंदे यांनी मतदारांना केले.

''संभाजीनगर हे ऐतिहासिक शहर आहे. जिल्हा परिषदवर विकासाचा भगवा फडकवायचा असेल, तर सर्व उमेदवारांना निवडून द्या. निधी कधीही कमी पडू देणार नाही, हा शब्द मी देतो,'' असे सांगत त्यांनी भाषणाची सांगता केली.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रातच करिअर निवडावे : डॉ. विश्वासराव आरोटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संगमनेर/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी इतरांच्या दबावाखाली न जाता आपल्या आवडीच्या व क्षमतेच्या क्षेत्रातच करिअरची निवड करावी. शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा आणि संस्था चालकांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आज ग्रामीण भागातील विद्यार्थी देशाच्या विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत, ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले.



संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले येथील माध्यमिक विद्यालयात आयोजित विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बाबासाहेब कडू, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सचिव घुले, विद्यालयाचे मुख्याध्यापक कोटकर, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. आरोटे म्हणाले की, पूर्वी शहरी भागातील विद्यार्थी शिक्षणात आघाडीवर होते. मात्र आता ग्रामीण भागात शाळांच्या इमारती, शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार स्पर्धात्मक ज्ञानदान सुरू झाल्याने ग्रामीण विद्यार्थीही देशपातळीवर चमकत आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना घडविण्याचे काम करीत आहेत. ग्रामीण भागातील आर्थिक अडचणी असूनही शिक्षणाची पायपीट थांबावी, या उद्देशाने संस्थेचे संस्थापक सचिव राघू जाधव यांनी अकोले व संगमनेर तालुक्यात शिक्षणाची दारे उघडली. मोठ्या शिक्षणसंस्था ज्या भागात पोहोचल्या नाहीत, तिथेही त्यांनी दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य केले असून आदर्श महिला या संस्थेमार्फत अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण व खाऊ वाटप करण्यात आले. तसेच विद्यालयासाठी सतरंजी व घड्याळ भेट देण्यात आले. विद्यालयाच्या निकालाची गुणवत्ता, स्वच्छता, तसेच विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग याबाबत डॉ. आरोटे यांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातही शहरी भागाइतक्या सुविधा उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देणे, हेच खरे शैक्षणिक कार्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी विद्यालयाच्या वतीने शास्त्री फळ व पुष्पगुच्छ देऊन डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे उपाध्यक्ष बाबासाहेब कडू यांनी विद्यालयाच्या गुणवत्तेबाबत मार्गदर्शन करत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मेहनतीमुळेच विद्यालयाने पंचक्रोशीत आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगितले. तसेच भविष्यकाळात थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या माध्यमातून विद्यालयात फरशी बसविण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

# राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत नाशिक संघाला प्रथम पारितोषिक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : टेनिस क्रिकेट असोशिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित राज्यस्तरीय सहावी चौदा वर्षे आतील अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी नाशिक येथील मोदी क्रीडा मैदानावर उत्साह संपन्न झाली यामध्ये प्रथम क्र. नाशिक ,द्वितीय क्रं. सातारा,तृतीय क्रं. धुळे व चौथा क्रं. सोलापूर जिल्हयानी मिळविला



या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ .मिनाक्षी गिरी व महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, सहसचिव चंद्रकांत तोरणे, महिला अध्यक्षा धनश्री गिरी, जिल्हा सचिव विलास गायकवाड, धुळे जिल्हा सचिव संदीप शिंदे, नंदुरबार जिल्हा सचिव संदीप खलाणे, जळगाव जिल्हा सचिव खुशाल देशमुख संभाजीनगर जिल्हा सचिव शफिक शेख सांगली जिल्हा खजिनदार स्वप्निल सुर्वे ठाणे जिल्हा सहसचिव महेश मिश्रा मुंबई उपनगर सचिव संदीप पाटील रायगड जिल्हा सचिव स्वप्निल अमरावती जिल्हा सचिव नितीन सराफ इत्यादी व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

यावेळी राज्यतून एकूण २४ संघांनी सहभाग नोंदवला तसेच भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन महासचिव सौ मिनाक्षी गिरी यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाबद्दल माहिती व नियम सांगितले.

पहिल्यांदी सर्व संघ साखळी पद्धतीने खेळवण्यात आल्या साखळी पद्धत तुन एकूण १६ संघ क्वालिफाय झाले त्यानंतर कॉटर फायनल साठी आठ संघ ,सेमी फायनल साठी चार संघ ,त्यामध्ये नाशिक ,धुळे ,सोलापूर आणि सातारा सेमी फायनल साठी क्वालिफाय झाले.

१४ वर्षे आतील स्पर्धेचा अंतिम सामना नाशिक विरुद्ध सातारा यांच्यात होऊन नाशिक संघाने उत्कृष्ट खेळ करत या स्पर्धेचे विजेतेपद प्राप्त केले तसेच द्वितीय क्रमांक सातारा, तृतीय क्रमांक धुळे व चतुर्थ क्रमांक सोलापूर तसेच बेस्ट बॅट्समन-वेद जाधव नाशिक मालिकावीर /-मिहीर काटकर (सातारा), उत्कृष्ट गोलंदाज /-लंबोदर निकम (सातारा) यांना मिळवल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्ष कन्हैया गुजर व महासचिव मीनाक्षी गिरी, महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, महिला अध्यक्ष धनश्री गिरी, नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड यांनी अभिनंदन केले.

या स्पर्धेमध्ये सोमा बिरादार, सत्यम पांडे महेंद्र देशमुख, धनश्री गीरी, धनजय लोखडे, जगदीश मोरे, कृष्णा पाटील, शुभम जगताप प्रशांत गुंजाल, रोहीणी सकटे पुजा सुर्यवंशी, संदीप पाटील, मानस पाटील, मयूर कोष्टी, देवेंद्र बाशुल यांनी पंच म्हणून काम पार पाडले.

राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा राजस्थान येथे होत आहे या स्पर्धेत महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबई संघ सहभागी होणार आहे.

## सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर मेरा बुद्रुक फाटा ग्रामस्थांचे सर्वच विभागाला दिले विनंती अर्ज




# मेरा बुद्रुक फाटा वस्तीमध्ये सिमेंटचे रस्ता, नाल्या, बांधण्यासाठी जिल्हाधिकारी यांना विनंती अर्जाद्वारे मागणी


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेले मेरा बुद्रुक येथील मेरा बुद्रुक फाटा वस्ती येथील नागरिकांनी दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी तसेच सर्वच विभागाला विनंती अर्ज देऊन मूलभूत गरजा त्यामध्ये आता वस्तीवरील रस्ते, सांडपाण्यासाठी नाल्या करण्याबाबत विनंती अर्जद्वारे विनंती केली असून त्या विनंती अर्जामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, आम्ही सर्व ग्रामस्थांनी एकत्रितपणे हा अर्ज सादर करत आहोत. मेरा बुद्रुक फाटा वस्ती, तालुका चिखली, जिल्हा बुलढाणा पिनकोड ४४३२०१ येथील तीस ते चाळीस वर्षापासून कायमस्वरूपी मेरा बुद्रुक फाटा वस्ती मध्ये कायमस्वरूपी राहत असून लोकसंख्या ७०० ते ८०० आहे.आम्ही सर्व मेरा बुद्रुक फाटा वस्तीवरील रहिवासी असून. आमच्या गावातील रस्त्याचे या ठिकाणी नवीन सिमेंट रस्ता, नाल्या, बांधण्याची विनंती करण्यासाठी हा अर्ज करत आहे. या रस्त्यामुळे शाळेत जाणाऱ्या मुलांना, वृद्ध व्यक्तींना आणि शेतकरी व इतर व्यावसायिकांना मोठा त्रास होतो. त्यामुळे, तातडीने गावकऱ्यांची सोय करावी,आमच्या घरातील/परिसरातील सांडपाणी व्यवस्थित नालीमध्ये सोडण्यासाठी पुरेशी व्यवस्था नाही, रस्ते नाही, नाल्या नाही आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे, साथीचे रोग पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे, परिसरातील नागरिकांना चालताना त्रास होत आहे, या समस्येमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. तरी, मी आपणास विनंती करतो की, आपण या गंभीर विषयाची दखल घेऊन आमच्या मेरा बुद्रुक फाटा वस्ती मध्ये तीस ते चाळीस वर्षापासून कायमस्वरूपी राहत असून लोकसंख्या ७०० ते ८०० आहे असून सांडपाणी गावातील मुख्य नालीमध्ये सुरक्षित आणि योग्य पद्धतीने सोडण्याची व्यवस्था करावी जेणेकरून या समस्येचे निराकरण होईल आणि परिसरातील स्वच्छता व आरोग्य राखले जाईल. अशी आमची मागणी आहे. या संदर्भात, आम्ही सर्व ग्रामस्थांनी एकत्रितपणे हा अर्ज सादर करत आहोत. प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी करताना स्थळ दर्शक छायाचित्रे (photographs) आणि जिओ टॅगिंग (Geo-tagging) बंधनकारक करण्यात येत असल्याबाबतचे आदेश देण्यात यावी ही विनंती. या कामासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, कृपया आपण जातीने लक्ष घालून समस्या मार्गी लावावी. अशी मेरा बुद्रुक फाटा वस्ती वरील नागरिकांनी ७० हून अधिक सह्या असलेले जिल्हाधिकारी यांना दिलेल्या विनंती अर्ज नमूद केले. ह्या विनंती अर्जाच्या प्रतिलिपी जिल्हा परिषद बुलढाणा, आरोग्य विभागाला देण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२




# खुदावाडी पंचायत समिती गणातून विजयाची तुतारी वाजणार ..?

## पद्माकर पाटील यांनी घेतली प्रचारात आघाडी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी पंचायत समिती गणातून निवडणूक लढविणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार पद्माकर पाटील यांची या मतदारसंघात विजयाची तुत-ारी वाजणार असा अंदाज राजकीय वर्तुळात वर्तविला जात आहे.

तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गट अंतर्गत येणाऱ्या ८४ खुदावाडी पंचायत समिती गणा-तून मौजे येडोळा येथील माजी सरपंच पद्माकर पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने तुतारी वाजविणारा माणूस या निवडणूक चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून त्यांनी आपल्या प्रच-ारात दिवसेंदिवस आघाडी घेतली असून अत्यंत सुत्रबद्ध पद्धतीने त्यांचा प्रचार चालू आहे. या गणात त्यांचा जनसंपर्क चांगला असून ते गत पंचवार्षिक मध्ये सरपंच असताना भटक्या विमुक्त जाती जमातीतील डवरी गोसावी समाजाच्या जवळप-ास ५० कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळवून देऊन बेघरांना हक्काचे घर मिळवून दिले आहे त्यांच्या या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने एक उत्कृष्ट सरपंच म्हणून त्यांचा गौरव केला आहे.गोरगरिबांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करतात.शिवाय नंदगाव जिल्हा परिषद गटावर मुळातच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राबल्य असून नामदार शरदचंद्रजी पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. तर भाजपा महायुतीने या मतदारसंघात निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या अनेक दिग्गज व निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून पुनश्च त्याच त्या उमेदवाराला उमेदवारी दिल्यामुळे भाजपा कार्यकर्त्यात नाराजी पस-रली आहे.याचा फायदा तुतारीला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय भाजपाच्या एका कार्यकर्त्याने बंडखोरी करत अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. त्यामुळे भाजप उमेदवारांना मिळणारी मते विभागली जाणार आहेत. त्यात राष्ट्रीय काँग्रेसच्या हाताला मिळणारी मते हे वंचित बहुजन आघाडीचे उम ेदवार,मनसेचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवार यांच्यामध्ये विभागले जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पद्माकर पाटील यांनी आपल्या प्रच-ारात सातत्य ठेवल्यास त्यांचा विजय हा निश्चित मानला जात आहे.

शेवटी या पंचायत समिती गणात विकासाचे कमळ फुलणार की विकासाला गती देणारे राष्ट्रीय काँग्रेसचा हात बळकट होणार की शेवटी विजयाची तुतारी वाजणार हे येत्या ९ फेब्रुवारी रोजी निकालानंतर कळणार आहे.

# सासवडला प्रांत कार्यालयासमोर १९ जानेवारीपासून सुरु असणाऱ्या आंदोलनाकाडे अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर तालुक्यातील मौजे आंबोडी येथे महार वतनाच्या जमिनीतून काही गुंतवणूकदारांनी प्रशासनाकडे रस्ता करावी अशी मागणी केली होती. यामध्ये प्रशासनाने संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात घेवून आणि स्थळ पाहणी करून निर्णय घेणे अपेक्षित होते. मात्र अर्थपूर्ण तडजोडीतून ठराविक शेतकऱ्यांच्या जमिनीतून थेट रस्ता तयार करण्याचे आदेश दिल्याचा आरोप केला केला आहे. संबंधित शेतकऱ्यांनी १९ जानेवारी पासून बेमुदत उप-ोषण सुरु केले आहे. विशेष महणजे आंदोलन सुरु करून १५ दिवसांचा कालावधी होवूनही प्रशासनाकडे त्याकडे कपूर्णपणे दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांनी संताप काव्यक्त केला आहे. आंबोडी येथील प्रकारा रणपिसे, चंद्रकांत रणपिसे, अशोक रणपिसे यांच्यासह इतर शेतक-यांनी पुरंदर - प्रांताधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरु केले आहे. आर्थिक तडजोडीतून परस्पर निर्णय दिल्याबद्दल तहसीलदार विक्रम राजपूतआणि मंडलं अधिकारी कांबळे यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी विभागीय आयुकताना केली आहे.

त्याचप्रमाणे रस्त्यासाठी मागणीचा अर्ज करणारे अन्बर बाबूलाल शेख हे आंबोडी येथील मूळ रहिवासी किंवा खातेदारही नाहीत, अन्वर यांनी २०१९ मध्ये गट नंबर १४१ हि महार वतनाची जमीन घेतलेली असून खरेदी दस्तामध्ये पूर्वेस कुंभारवळण शिवरस्ता असा उललेख असल्याचे दिसून? येत आहे. मात्र शेख यांनी शिव रस्त्याचा वापर न करता केवळ आमच्याच जमि नीतून रस्ता करण्याचा हट्ट का.

जमिनीतून रस्ता करण्याचा हट्ट का धरला आहे? असा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच गट जमीन १४१ मध्ये क्षेत्र असताना पुढील क्षेत्रातून रस्ता करण्याची केलेली मागणी चुकीची आहे. जिथे क्षेत्र नाही तिथे रस्त्या करण्याची तुम्हाला गरज काय आहे त्यामुळे यामध्ये प्रशासनाने स्थळ पाहणी न करता केवळ मागणीच्या आधारे रस्त्याला परवानगी दिलेली आहे.

याचाचत संबंधित शेतकऱ्यांनी सांगितले कि, आंबोडी येथील इनाम वर्ग ६ च. महार वतन वर्ग दोन ची शेतजमीन गट नंबर १३१, १३२, १३८, १३९, १४०, १४१, १४२, १४३, १४४, १४५, १५६, १४० आणि १४८ मधून बबन शंकर रणपिसे आणि राहीबाई धाकू गजरे यांच्या वतीने सुवर्णा गायकवाड तसेच अन्वर बाबूलाल शेख यांनी पुरंदरच्या तहसीलदारांकडे मागणी केली होती. मात्र पातील बबन शंकर रणपिसे यांची कोणत्याही प्रक्रियेत त्या तहसील कार्यालयाकडे फिरकल्या देखील नाहीत. राहीबाई धाकू गजरे या मयत असून त्यांच्या वतीने मागणी करणारे सुवर्णा गायकवाड यांचे कोणत्याही सातबारा उतारावर साधे नाव देखील नसल्याने त्यांचा रस्त्याची मागणी मारण्याचा अधिकारच नाही. आणि त्यांची कोणत्याही अर्जावर साधी सही देखील नाही.

# सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय विद्युत अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांची विश्वेश्वरय्या संग्रहालयास अभ्यासपूर्ण भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कोर्टी (तालुका पंढरपूर) येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय पंढरपूरच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातर्फे दिनांक २३ जानेवारी ते २६ जानेव-ारी २०२० या कालावधीत द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक शैक्षणिक दौऱ्याची यशस्वी आयोजन करण्यात आले या दौऱ्या दरम्यान विद्यार्थ्यांनी कर्नाटक राज्यातील बेंगळूर व म्हैसूर येथील विविध औद्योगिक शैक्षणिक तसेच ऐतिहासिक स्थळांना भेट देत प्रत्यक्ष अध्यापनाच्या मौल्यवान अनुभव घेतला.

या शैक्षणिक दौऱ्याच्या प्रमुख टप्प्यात दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांनी बेंगळूर येथील जागतिक कीर्तीचे विश्वेश्वरय्या इंडस्ट्रीला अँड टेक्नॉलॉजीकल म्युझियम येथे औद्योगिक प्रक्रिया तसेच नाविन्यपूर्ण तांत्रिक नऊ संकल्पनांची सखोल माहिती मिळाल्याचे महाविद्यालयीन प्राचार्य डॉक्टर कैलास कारंडे यांनी सांगितले.

या शैक्षणिक भेटीमुळे सिद्धांत व प्रत्यक्ष उपयोगी यामधील दरी कमी होऊन विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक दृष्टिकोन अधिक प्रकल्प झाला आहे. तंत्रज्ञान व औद्योगिक क्षेत्रातील भविष्यातील करिअर विषयी विद्यार्थ्यांची आवड आणि आत्मविश्वास वाढल्याचे त्यांच्या प्रतिक्रियेतून स्पष्ट झाले.



या औद्योगिक शैक्षणिक सहलित विद्युत अभियांत्रिकी विभागातील द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला सदर सहलीचे आयोजन म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर कैलास कारंडे व उपप्राचार्य डॉक्टर स्वानंद कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले व विद्युत विभाग प्रमुख डॉक्टर के शिवशंकर आय व्ही समन्वयक प्राध्यापक प्रा अमोल गोडसे, तसेच प्रा विनोद कुमार मोरे, प्रा दत्तात्रय कोरके, प्रा सोनाली घोडके, यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उप-स्थित होते.




# स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज' मध्ये यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) च्या स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'ई-सेल स्टुडन्ट टीम' चे विद्यार्थी 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज' मध्ये सहभागी झाले होते. आयआयटी बॉम्बेने या स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील यशामुळे त्या सहभागी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार यांच्या सहकार्याने या विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धे त घवघवीत यश मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. हर्षवर्धन रोंगे यांचे मार्गदर्शन लाभले. स्वेरीच्या या विद्यार्थ्यांचे यश हे विशेष असे आहे कारण गोपाळपूर सारख्या ग्रामीण भागात असणाऱ्या स्वेरीतून शिक्षण घेऊन शहरी विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करत असू-नही त्यांनी हे यश संपादन केले आहे. खेळ असो व स्पर्धा, स्वेरीचे विद्या-र्थी हे परिश्रम करतातच, हे 'नॅशनल आंत्रप्रनरशिप चॅलेंज' या स्पर्धेत मि ळालेल्या यशावरून समजते. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये शिक्षण घेणाऱ्या समिक्षा खटावकर, समीक्षा गटकळ, सानिका बागल, शुभांगी सगर, प्रतीक्षा चौधरी, नूपुर अचलारे, वैष्णवी पाटील, श्रद्धा सलवदे, तृप्ती बुरगुटे, जय गाडेकर, फैयाज तांबोळी, अथर्व काकडे, दिग्विजय बुरा, ओंकार येलगोंडे व भूषण बागल, अशा १४ विद्यार्थ्यांनी 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज'मध्ये सहभाग घेतला होता.

**१४ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग**

सांघिक कामगिरी करत असताना या विद्यार्थ्यांनी प्राथमिक फेरीमध्ये सर्वो त्तम कामगिरी केली. त्यांनी दि.१० डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान आयआयटी मुंबई येथे झालेल्या अंतिम फेरीत सहभाग घेतला. स्पर्धेत संपूर्ण भारतातील सहभागी झालेल्या ४ हजारांहून अधिक असलेल्या महाविद्यालयांमध्ये त्यांनी अंतिम फेरी मध्ये ३६ वा क्रमांक मि ळवला आहे. अशा स्पर्धांमध्ये सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढीस लागतो आणि त्यामुळे चांगले करिअर करण्यासाठी हातभार लागत-ो. त्यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडते. स्वे-रीमध्ये संशोधनात्मक कार्यशाळा होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना एक प्रकारची प्रेरणा मिळते यासाठी स्वेरीतील ई-सेल टिम परिश्रम घेत आहे. या यशामुळे स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोस-ले, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, संशोधन अधिष्ठाता, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

**मूकनायकच्या १०५ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय परिसंवाद संपन्न**

**बी.बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# भारताचे संविधानाला अभिप्रेत, दृष्टिकोनयुक्त वर्तमानपत्रे वाचली पाहिजेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशनच्या संयुक्त विद्यम ाने मूकनायकच्या १०५ व्या वर्धापन दिनानिमित्त मूकनायकची प्रासंगिकता, आव्हाने आणि उपाय योजना या विषयावर डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयात ३१ जानेवारी २०२६ ला परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.






परिसंवादात उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायकची जाहिरात केसरीला पाठविली होती, जी त्यांनी छापली नाही. याचा अर्थ प्रस्थापितांच्या मनात किती द्वेष, मत्सर आणि आकस होता? हे सिद्ध होते. अर्थात सामाजिक अभिसरणाला त्यांचा विरोध होता. म्हणूनच मूकनायचा जन्म झाला. त्या म ाध्यमातून देशभरातील अस्पृश्यांना जागृत केले गेले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजात हजारात नऊ लोक शिकलेले असताना बाबासाहेबांनी म ूकनायक चालविले होते तर मग आज ८६ टक्के लोक साक्षर असताना आपण वर्तमानपत्र का चालवू शकत नाही? करिता आपण त्याची मूळ कारणे शोधली पाहिजेत. जेणेकरून बहुजन समाजाच्या उत्थानासाठी सर्वांगीण मीडिया चालविला जाऊ शकेल. सामाजिक जनमत तयार करण्यासाठी मीडियाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. मीडिया हा जनमत निर्माण करण्याचा कारखाना आहे. आता केवळ ब ा त म ीपत्र वाचून चालणार नाही तर भारताचे संविधानाला अभिप्रेत असणारी दृष्टिकोनयुक्त वर्तमानपत्रे वाचली पाहिजेत. जेणेकरून आ-पणास परिवर्तनवादी महापुरुषांच्या स्वप्नातील आदर्श भारत निर्माण करता येईल. परिणामी भेदभाव युक्त समाजातील ३६ चा आकडा नष्ट होऊन ६३ मध्ये परिवर्तित होऊन शांतताप्रिय मानवतावादी समाज तयार होऊ शकेल. ज्या वर्तमानपत्रात आमच्या सुखदुः खाचा आवाज मांडला जाईल, तोच आमचा मेनस्ट्रीम मीडिया होय.

याप्रसंगी दि ऑल इंडिया नाग असोसिएशनचे चेअरमन डॉ. राजीव कुमार म्हणाले की, जगातील महान लोकशाही पाळणारे भारत हे एक राष्ट्र आहे. सामाजिक व आर्थिक समानता निर्माण केल्यावरच लोकशाहीची अंमलबजावणी केल्यासारखे होईल. करिता समाजाचे सम ाजभान निर्माण करावे लागेल. दैनिक सार्वभौम राष्ट्रचे संपादक प्रेमरत्न चौकेकर म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी म ूकनायकला २५०० रुपयाची देणगी दिली होती. ज्याची किंमत आज साडेतीन कोटी रुपये इतकी आहे. त्या प्रमाणात किंमत मोजून आपणास देशव्यापी मीडिया निर्माण केला पाहिजे. दामाचे सचिव डॉ. आनंद तारू म्हणाले की, पत्रकारिता ही समाजाची रक्तवाहिनी आहे. एन सी सी डी चे सेवानिवृत्त संयुक्त संचालक डॉ. एल. जे. कान्हेकर म्हणाले की, पेन आणि ब्रेनच्या सहकार्याने मीडिया चालत असतो. निळे प्रतीक चे संपादक रतनकुमार साळवे म्हणाले की, केवळ टीआरपी वाढविण्यासाठी भावनिक मुद्द्याचे राजकारण करून चालणार नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची म ूल्यवर्धित पत्रकारिता जोपासून समाज जोडावा लागेल. दि ऑल इंडिया नाग असोसिएशनचे म हासचिव मयंकराज सिंग म्हणाले की, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, त्याचे संवर्धन केले पाहिजे.

या परिसंवादासाठी तामि ळनाडू वरून डॉ. कामराज गणेशण, बेंगलोर वरून डी. आर. आर्या, बिहार वरून डॉ. रघुवीर प्रजापती, सुधीर कुमार, जे एन राम, डॉ. उपेंद्र, दिल्लीवरून आर. के. सिंग, डॉ. रूपचंद गौतम, श्याम नारायण, नागपूर वरून डॉ. चंदू मैस्के, डॉ. एल. जे. कान्हेकर, बिदर वरून महाद-ेव कांबळे अशाप्रकारे विविध सात राज्यातील प्रतिनिधी सह शेकडो स्थानिक हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित हो-ते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विलास कटारे तर सूत्रसंचालन ड. विलास रामटेके व आभार प्रा. शिवम गायकवाड यांनी व्यक्त केले. ड. सुनील कुमार नागवंश यांच्या समूहाने उत्कृष्ट प्रबोधनपर गीते सादर केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उद्योजक मिलिंद बागुल, उद्योजक शशिकांत काळे, डॉ. जोगेंद्र पाचगावकर, महादेव डांबरे, ड. राजू बागुल, डॉ. व्ही. एच. कांबळे इत्यादी प्रतिनिधीनी विशेष प्रयत्न केले.

# प्रशासकीय क्षेत्रातील लेखणीचा जागर!

## नवी दिल्ली सात ते आठ मार्च रोजी पहिली महिला शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रशासकीय क्षेत्रातील महिला अधिकाऱ्यांच्या साहित्यिक प्रतिभेला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि स्वराज्य रक्षक महाराणी ताराराणी यांच्या शौर्याचा वारसा जतन करण्यासाठी सरहद्द पुणे आणि महाराष्ट्र सदन नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी सात व आठ मार्च २०१६ नवी दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन येथे पहिली अखिल भारतीय मराठी महिला शासकीय अधिकारी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.



आज नवी दिल्लीत आयोजित विशेष पत्रकार परिषदेत संमेलनाच्या नियंत्रक तथा महाराष्ट्र साधनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर सिमला यांनी या संमेलनाचे अधिकृत घोषणा केली पत्रकार परिषदेला महाराष्ट्र परिचय बैठकीच्या हेमराज बागुल जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे आणि शहद्ये-चे संयोजन यशपाल जवळगे उपस्थित होते.

आज नवी दिल्ली आयोजित विशेष पत्रकार परिषदेत संमेलनाच्या निमंत्रक तथा महाराष्ट्र लग्नाच्या निवासी आयुक्त व सचिव आर विमला यांनी या संमेलनाचे अधिकृत घोषणा केली व पत्रकार परिषदेला महाराष्ट्र परिचय केंद्राची संचालक हेमराज बागुल जलसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे आणि

या संमेलनाची संयोजक सहभागी ताराराणी यांच्या ३९१ जयंती वर्षाचे औचित्य साधून करण्यात आले आहे प्रशासनात कार्यरत असलेल्या महिला अधिकार्यांमधील स्वप्न साहित्यिक गणना व्यासपीठ ओळख मिळवून देणे हा उपक्रम मुख्य हेतू आहे. संमेलनाचे उद्घाटक म्हणून भारताचे राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू माझी लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा देवेंद्र फडणवीस आणि मराठी भाषा मंत्री उदय सावंत यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

हे संमेलन अत्यंत भव्य स्वरूपात नियोजित असून, एकाच वेळी तीन समांतर सभागृहामध्ये विविध उपक्रम मगणार आहेत सभागृह१) सामाजिक व साहित्यिक परिसंवाद, चर्चासत्र आणि मान्यवरांच्या मुलाखती, सभागृह २) निमंत्रित कवीचे भव्य काव्य संमेलन सभागृह ३) पुस्तक व प्रकाशन गझल सादरीकरण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

देश व भारतातील विविध राज्यांमधील पदावर कार्यरत असलेल्या मराठी महिला व शासकीय अधिकाऱ्यांची या संमेलनात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान संयोजका तर्फे करण्यात आले आहे.

## सौ रोहिणी महेश साठे यांची प्रचारात जोरदार मुसंडी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळी पंचायत समितीच्या निवडणुकीत रोजच नवनवीन रणनीती बघायला मिळत आहे. पंढरपूर तालुक्यातील टाकळी गणात दिवसेंदिवस ही लढाई रंगतदार होताना दिसत आहे.

श्री एकनाथजी शिंदे गटाच्या उमेदवार सौ रोहिणी महेश साठे यांच्या प्रचारार्थ सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे यांच्या सर्व मित्र परिवारासह संपूर्ण तालुक्यातील शिवसैनिक एकवटला आहे.

तसेच टाकळी गटात शिवसैनिक प्रचार रॅली मोठ्या प्रमाणात शक्तिप्रदर्शन करत जिल्हा परिषद व पंचायत समिती रणधुमाळी सुरू असून टाकळी जिल्हा परिषद गटात शिवसैनिक प्रचार रॅली काढली होती. शिवसेनेचे उमेदवारापासून शेवटच्या मतदारापर्यंत पोचून श्री एकनाथजी शिंदे यांचे सर्व सामान्य पर्यंत जनतेला केंद्रबिंदू मानून केलेल्या कामाची हो राहिलेले विकास कामांना गती देण्यासाठी निवडून देण्याचे आव्हाने शिवसेनेकडून केले जात आहे.

टाकळी गावचे सरपंच पदी श्री संजय शेटे यांनी काही काही काळ बसवले असून

### सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे निष्ठेसाठी यांनी बांधला चंग

त्यांच्या काळात अनेक तसेच शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे यांनी विकास प्रयत्न केल्याचे सांगितले आहे. जिल्हा परिषदेला अधिकृत उमेदवार म्हणून दीपक चंदनशिवे अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या खर्डी पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार शत्रूगण रणदिवे खुल्या वर्गासाठी राखीव असलेल्या टाकळी गणातून सौ रोहिणी महेश साठे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे यांच्या पत्नी या निवडणूक रिंगणात उतरलेले आहेत.

## संत रविदास महाराज यांची जयंती साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : दि. ०१ फेब्रुवारी रोजी सिरसवाडी ता.जालना येथे संत रविदास महाराज यांची जयंती रिपब्लिकन सेना चे जालना जिल्हाअध्यक्ष लिंबाजी वाहुळकर यांनी संत रविदास महाराज यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

प्रमुख उपस्थित संत रविदास शेतकरी गटाचे अध्यक्ष हारीचंद कुमटे, काशिनाथ वाघमारे, रामनाथ काजळकर, प्रकाश वाघमारे, एकनाथ काजळकर, विष्णू काजळकर, साहेबराव काजळकर, भाऊलाल कुमटे भागवत कोकणे उपस्थित होते.

## युरोप कृषी अभ्यास दौऱ्यासाठी पत्रकार रणदिवे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने युरोपमधील कृषी अभ्यास दौऱ्यासाठी पत्रकार धनंजय रणदिवे यांची निवड झाली आहे. १६ फेब्रुवारी रोजी कृषी अभ्यासकांची टीम युरोपला रवाना होणार आहे. कृषी विभागाच्या सहसंचालक कार्यालयाकडून या संदर्भात माहिती दिली आहे.



यावर्षी युरोप मधील कृषी अभ्यास दौऱ्यात फ्रान्स, जर्मनी, स्वीझर्लंड, नेदरलँड आदी देशातील अत्याधुनिक शेती, नविन तंत्रज्ञान, याद्वारे केली जाणारी शेती याची माहिती घेतली जाणार आहे. यामध्ये धान्य पीक शेती, आधुनिक दुग्धशाळा, स्थानिक तज्ञांशी चर्चा, द्राक्ष बाग, वाईन प्रक्रीया पाहणी, बागायती संशोधन केंद्र पाहणी, दूध प्रक्रिया संस्थांना भेटी, पर्वतीय दुग्धशाळा भेटी, चराई पद्धत, उंच प्रदेशातील पशूपालन, चीज प्रक्रिया केंद्र पाहणी, होहेनहाइम विद्यापीठ संधोधन केंद्र भेट (जर्मनी), दुग्ध संशोधन शेत व पारंपारिक दुग्धशाळा भेट, आल्समीट फूल बाजार, आधुनिक हरितगृह, मत्स्य पालन प्रकल्प पाहणी, बागायती इनोव्हेशन सेंटर आदींची पाहणी राहणार आहे. युरोप दौरा १६ ते २७ फेब्रुवारी असा १२ दिवसांचा राहणार आहे.

या निवडीबद्दल श्री रणदिवे यांचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार, कृषी सहसंचालक पूनम खटावकर, जिल्हा कृषी अधीक्षक राजकुमार मोरे, उपाधीक्षक श्री आसलकर आदींनी अभिनंदन केले आहे.

## विक्रांत नागटिळक यांच्या खिलार गाईचा प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुसेगाव ता. खटाव येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय जातिवंत खिलार जनावरांच्या प्रदर्शनामध्ये कौठाळी ता. पंढरपूर येथील विक्रांत नागटिळक यांच्या खिलार राधाने प्रथम क्रमांक मिळवला.



या प्रदर्शनाच्या वेळी महादेव इंगळे यांच्या खिल्लार गायीने दुसरा क्रमांक, अभिमान नागटिळक यांच्या आदत कालवडीने दुसरा क्रमांक, सिताराम पवार यांच्या कालवडीने तिसरा क्रमांक, शामराव नागटिळक यांच्या कालवडीने तिसरा क्रमांक, खिलार गायीने दुसरा क्रमांक, बाळासाहेब इंगळे यांच्या कालवडीने दुसरा क्रमांक, बाळासाहेब मुळे यांच्या कालवडीने दुसरा क्रमांक मिळविला

श्री तीर्थक्षेत्र पुसेगाव तालुका खटाव येथील श्री सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्टच्या वतीने राज्यस्तरीय जातिवंत खिलार जनावरांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यापूर्वीही विविध ठिकाणी कौठाळी येथील खिल्लार प्रेमींनी पारितोषक मिळवली आहेत. सेवागिरी देवस्थान ट्रस्टचे चेअरमन संतोष वाघ, मठाधिपती श्री महंत सुंदरगिरीजी महाराज यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन खिलार प्रेमींचा सन्मान करण्यात आला. खिलार प्रेमींचे ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## कर्तृत्व, संस्कार आणि सेवेचा संगम : राजेश्री बसवराज शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : संधीचं सोनं करणारी माणसं फार कमी असतात आणि त्या मोजक्या लोकांत नाव घेतलं जातं ते राजेश्री बसवराज शेळके यांचं. वागदरीसारख्या ग्रामीण भागातून, संस्कारांची शिदोरी, शिक्षणाची ताकद आणि समाजसेवेची ओढ मनाशी बाळगून पुढे आलेलं हे नेतृत्व केवळ योगायोगाचं नाही, तर जिद्द, चिकाटी आणि मूल्यांची देण आहे.

वागदरीच्या शेळके परिवाराच्या मोठ्या सुनबाई असलेल्या राजेश्री यांचं माहेर कळसगोंडा. वडील हे सदनशील शेतकरी, पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे समाजाशी नातं जपणारे, मदतीचा हात पुढे करणारे समाजसेवक. लहानपणापासूनच आपण लोकांच्या उपयोगी आलंच पाहिजे ही शिकवण त्यांच्या मनात खोलवर रुजली. गोरगरीब, गरजू लोकांसाठी काहीतरी करावं, ही भूमिका त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव बनली.

च, इ.एव., ऊएव. इतकं संपूर्ण शिक्षण त्यांनी शासकीय शिष्यवृत्तीच्या माध्यमातून पूर्ण केलं. संघर्षाची जाण, कष्टाचं मोल आणि शिक्षणाची किंमत त्यांना स्वतःच्या अनुभवातून कळली. म्हणूनच शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि महिला सक्षमीकरण हे विषय त्यांच्या हृदयाच्या अत्यंत जवळचे आहेत. अभ्यासपूर्ण मांडणी, मुद्देसूद भाषण आणि संयत पण ठाम भूमिका ही त्यांची खासियत ठरते.

वागदरी पंचक्रोशीत शेळके हे नाव केवळ आडनाव नाही, तर विश्वासाचं प्रतीक आहे. दानशूर परिवार म्हणून ओळख असलेल्या या घराण्यामुळेच वागदरीत शैक्षणिक संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली. गेली साठ वर्षे एस. एस. शेळके प्रशाला हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देत आहे. शेळके सावकारांकडे गेलेला माणूस रिकाम्या हाताने परत गेला नाही ही म्हण आजही लोकांच्या ओठांवर आहे.

अशाच दानशूर, सेवाभावी वातावरणात राजेश्री यांचा विवाह बसवराज शेळके यांच्याशी झाला. त्यांच्या शिक्षणाला, विचारांना आणि कार्याला येथे आणखी बळ मिळालं. आज त्या संस्थेत अध्यापन करत असून, एक उत्तम, आपुलकीची आणि प्रेरणादायी शिक्षिका म्हणून विद्यार्थ्यांच्या मनात खास स्थान निर्माण केलं आहे.

शेळके परिवाराची सामाजिक-राजकीय परंपरा देखील तितकीच गौरवशाली आहे. १९९१ साली रत्नाबाई शेळके भारतीय जनता पार्टी कडून राजकारणात उतरल्या आणि जिल्हा परिषद निवडणूक जिंकून लोकसेवेचा विश्वास सार्थ ठरवला. तब्बल ३५ वर्षांनंतर, २०२६ मध्ये पुन्हा एकदा नियतीने शेळके परिवाराला लोकसेवेची संधी दिली आहे. यंदा राजेश्री बसवराज शेळके या जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत.



राजकीय समीकरणं बदलली असतील, पण शेळके परिवारावरचं लोकांचं प्रेम आजही तसंच आहे. राजेश्री या नवख्या असल्या, तरी त्यांच्यातील जिद्द, चिकाटी, समाजसेवेची प्रामाणिक ओढ आणि उच्च शिक्षण हे त्यांचं मोठं भांडवल आहे. संवेदनशील मन, अभ्यासू दृष्टी आणि सेवाभावी वृत्ती यांचं सुंदर मिश्रण असलेलं हे नेतृत्व वागदरी जिल्हा परिषद मतदारांना नक्कीच आश्वस्त करेल, अशीच अपेक्षा आहे.

ही केवळ निवडणूक नाही, तर मूल्यांची, परंपरेची आणि नव्या दमाच्या कर्तृत्वाची कसोटी आहे

आणि या कसोटीत राजेश्री बसवराज शेळके निश्चितच उजवी ठरतील, असा विश्वास अनेकांच्या मनात रुजत आहे.

### निफाड मोरे महाविद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

### कवी बाबासाहेब सौदागर यांचे प्रतिपादन

## मन आणि मातीच्या तळाशी जन्मते नवे गीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळ्या प्रसंगी सुप्रसिद्ध चित्रपट गीतांचे लेखक बाबासाहेब सौदागर यांचे प्रतिपादन.

आदिम काळापासून माणसाची नाळ शेती आणि मातीशी जोडली गेली आहे. जसा शेतकरी मातीतून नवे पिक उगवतो तसेच गीतकार आणि कवी हा आपल्या मनाच्या सृजनशील मातीतून नवे गीत निर्माण करतो,

आज मराठी मनावर ज्या गोष्टींचा जास्त परिणाम होईल अगदी तसाच चांगला किंवा वाईट तरुण समाजात तयार होईल हे ओळखून, आजच्या तरूणांनी प्रसारमाध्यमांबरोबरच साहित्याचे देखील वाचन व अकलन करावे, एखादे पुस्तक जीवनाची दिशा निश्चित करू शकते. जीवन परीपूर्ण आणि सुंदर बनविण्यात साहित्य महत्वाचे ठरते. तरूणांनी ध्येयवादी आणि जीवनव्यवहारी बनण्यासाठी आपले आवडीचे छंद, कला, अभिनय, संगीत, साहित्याचे वाचन आणि लेखन यात आपले मन रामविल्यास एक सुजान नागरिक आपोआप तयार होईल असा विश्वास सुप्रसिद्ध कवी व चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर यांना व्यक्त केला......

मोरे महाविद्यालयात आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बाबासाहेब सौदागर बोलत होते, यावेळी व्यासपीठावर मविप्र संचालक शिवाजी गडाख, मविप्र संचालिका शोभाताई बोरस्ते, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. उत्तमराव डेर्ले, सौ. कविता सौदागर लभडे, प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे, माधवराव गीते, अशोक कुंदे, यशवंत वडघुले, सुधाकर कापसे, रामनाथ धारराव, राजाराम काळे स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. आर. डी. शिंदे, डॉ. डी. टी. ढगे, प्रा. अभय वडघुले व मान्यवर उपस्थित होते..... कवी पुढे म्हणाले की शब्दाचे गमतीशीर खेळ म्हणजे भाऊ च्या उलट उभा जो पाठीशी खंबीर उभा तोच भाऊ, तप च्या उलट पत, जो आपल्या कामात कष्टाचे तप करतो त्याचीच पत निर्माण होते. अशी सुरेख उदाहरणे देत त्यांनी अनेक चित्रपट गीतांचे व काव्यांचे उदाहरणे देत प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मविप्र संचालक शिवाजी गडाख यांनी मनोगतात, निफाड महाविद्यालयात नुकताच आयोजित केलेल्या यशस्वी माजी विद्यार्थी मेळाव्याचे विशेष कौतुक करत केले .विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात अधिक सक्षम होण्यासाठी मेहनत घ्या असे शेवटी सांगितले..



संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते . शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ उत्तमराव डेर्ले यांनी ही आपल्या मनोगतात मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रास्तविकात प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे म्हणाले, विद्यार्थी गुणगौरव सोहळा हा वर्षभर साहित्य,कला,क्रीडा आणि संशोधन क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव असतो. यातून इतरांना नवी प्रेरणा आणि दिशा मिळते, महाविद्यालयाच्या विकासाची दिशा निश्चित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या युगात यशापयशाच्या अनुभवातून स्वतःला सिद्ध करा असे आवाहन केले.

यावेळी सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते सर्व प्रकारच्या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा आणि गुणवंत प्राध्यापकांचा पारितोषिक देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी बक्षीसपात्र विद्यार्थ्यांची नावे प्रा. चंद्रशेखर मोरे, प्रा. प्रवीण शार्दुल, प्रा. चेतन कुंदे, श्रीमती मनिषा कोटकर, डॉ. बी. सी. आहेर यांनी वाचन केले.



या कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीततेसाठी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका आणि सेवक वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले, या कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.